# विशेष पोलीस वार्तापत्र

दिनांक 12/07/2018

## पत्नी, प्रियकर व त्याचे मित्राने संगणमत करुन अनैतिक संबधात अडसर ठरणा-या पति रशीदचा दगडाने ठेचुन केला खुन
## अपघात असल्याची खोटी फिर्याद देवुन पोलीसांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न
## स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळची कामगीरी.

---

दि. 18/03/2018 रोजी सकाळी 06.00 वाजल्याचे सुमारास कळंब चौक ते नागपुर रोडवरील शमी भंगारवाला यांचे गोडावुन समोर रोडच्या कडेला शेख रशिद फकीर मोहमद कुरेशी यांचे प्रेत पडलेले मिळून आले. मृतकाचे शरीरावर प्राथमिक दृष्टया अपघाताच्या जखमा दिसत असल्याने यवतमाळ शहर पोलीस ठाणेस मयताची पत्नी फिरोजा बानो शेख रशिद कुरेशी रा कळंब चौक यवतमाळ हिचे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे यवतमाळ शहर येथे सुरुवातीस आकस्मात मयत रजि. नं 26/2018 कलम 174 जा.फौ. प्रमाणे व त्यानंतर आठ दिवसांनी मयताच्या पत्नीच्या फिर्यादीवरुन अप नं 200/2018 कलम 279, 304 अ भादवि प्रमाणे अज्ञात वाहनाचे चालकावर 'निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यू घडवून आणणेबाबतचा गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गुल्हाणे हया करीत होत्या. सदर बाबत मृतकाच्या पत्नीने अथवा इतर नातेवाईकांनी शेख रशीद याचे मृत्युबाबत कोणावरही संशय व्यक्त केला नव्हता.

मागील पंधरा दिवसांपुर्वी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि सुरज बोंडे यांना मिळालेल्या गोपणीय बातमीप्रमाणे सदर मृत्यु हा अपघात नसून तो संगनमताने केलेला खुन असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली होती. सदर मृतकास ताजबाग नगर येथे मारहाण करुन त्याचा खुन केला असल्याची माहीती हस्तगत झाली होती. सदर माहीती मिळाल्यावर सपोनि सुरज बोंडे यांनी बातमीची हकीकत **स्था.गु.शाखेचे पोलीस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी यांना सांगुण त्यांचे मार्गदर्शनाखाली पथकातील कर्मचा-यांच्या मदतीने सदर परिसरात मागील आठ दिवसांपासुन या संदर्भातील साक्षीदार निष्पन्न करणे कामी काम केले त्यातुन सदर घटणेबाबत खात्रीशीर साक्षीदार व ईतर पुरावे पथकास हस्तगत झाले होते.**

दरम्यान मुदतीत मागील आठ दिवसांपुर्वी मयताचा पुतन्या यानेही यवतमाळ शहर पोलीस ठाणेस घातपाताचा संशय असल्याचा जबाब तपासादरम्यान दिला होता.सपोनि सुरज बोंडे यांनी यातील संशईत मो.एजाज मो. मोझम कुरेशी वय 29 वर्षे, कळम चौक, यवतमाळ यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली आहे.

दिनांक 17.03.2018 रोजी एजाज याने मयताची पत्नी फिरोजाबानो हिचे सांगण्यावरुनशेख रशीद याचा खुन करुन त्याचा मित्र ईमरान्नोद्दीन याचे मदतीने मृतदेहाची विल्हेवाट लावल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

**एकंदरीत फिरोजाबानो हीचा मयत पती रशीद हा अपंग असल्याने काहीही कामधंदा करीत नव्हता तसेच दारुचे व्यसन करुन तिला मारहाण करुन त्रास देत असे तसेच तिचे एजाज याचेशी अनैतिक संबधात तो अडसर होत असल्याने तिने एजाज**

भावे सोबत त्यास जिवे मारण्याचे संगणमत केले फिरोजाबानो हिचे सांगणे वरुन एजाज याने शेख रशीद याचा दगडाने ठेचुन खुन केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. खुन केल्यावर मयताच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्या करीता एजाज याचा मित्र इमरानोदीन याने मदत केली असल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे फिरोजाबानो शेख रशीद कुरेशी वय 40 वर्षे रा. कळम चौक, मो.एजाज मो. मोइम कुरेशी वय 29 वर्षे, कळम चौक, यवतमाळ व इमरान्नोद्दीन सादीकोददीन सयद वय 42 वर्षे रा. तायडे नगर यवतमाळ यांना अटक करुन पुढील तपासकामी पो.स्टे. यवतमाळ शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगीरी मा.श्री. एम.राज कुमार, पोलीस अधीक्षक, यवतमाळ. मा.श्री.अमरसिंह जाधव,अपर पोलीस अधीक्षक,यवतमाळ, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मुकुंद कुलकर्णी, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/ सुरज बोंडे, सफौ ओमप्रकाश यादव,पोहवा बंडु डांगे, गजानन धात्रक, पोना विशाल भगत, किरण पडघन. पो.कॉ. निलेश भुसे ,मपोशी ममता देवतळे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी पार पाडली.

पोलीस अधीक्षक,यवतमाळ
करीता